# कंत्राटी पदभरती जाहिरात
# आरोग्य विभाग पुणे महानगरपालिका

दिनांक ०४/०९/२०२५

**आरोग्य खाते पुणे महानगरपालिका यांचे नियंत्रणाखाली मेट्रोपोलिटन सर्व्हेलन्स युनिट (MSU) अंतर्गत खालील कंत्राटी रिक्त पदे ६ महिने कालावधीसाठी संवर्गनिहाय भरावयाची आहेत.**

| Sr. No. | Name of post | No. of posts | Essential Qualification and Experience | Suggested Remuneration (maximum per month) |
|---|---|---|---|---|
| 1 | Senior Public Health Specialist | 1<br>Open to all | **Essential Qualifications: Either 1 or 2 or 3**<br>1) MBBS recognized by Medical Council of India (MCI) with MD (PSM/Community Medicine) / MD (CHA) / MD(Tropical Medicine) recognized by MCI or DNB (Social and Preventive Medicine / Community Medicine);<br><br>2) MBBS recognized by MCI with EIS Training CourseCertificate.<br><br>3) BDS / BAMS / BHMS / BUMS / BPT / B.Sc. in Life Sciences (Nursing/Biology/Microbiology/ DevelopmentalBiology & Physiology) with<br>- Masters of Public Health (MPH-Epidemiology) /Diploma in Public Health (DPH-Epidemiology)<br>OR<br>- Master in Applied Epidemiology (MAE) from recognized University of India along with two years of experience in Public Health after acquiring mentioned postgraduate qualifications;<br>OR<br>-PhD in Clinical Sciences/Medical Sc./PreventiveMedicine/Human Physiology/ Pathophysiology /Epidemiology<br><br>**Experience required:**<br>≥ 10 years of field experience after obtaining essential qualification in implementing Public Health Programmes/ Interventions with a focus on communicable diseases.<br>- Candidate must have passed 100 Marks Marathi Language Examination in his/her SSC and HSC standards.<br>- Candidate must have command on Marathi Language<br><br>**Age Limit**<br>18 to 38 years for Open category,<br>18 to 43 Years for reserved categories. | Rs 1,75,000 (For MBBS with MD/DNB)<br><br>Rs. 1,50,000 (For MBBS with EIS training Course certificate)<br><br>Rs. 1,25,000 (For B. Sc.in Life Sciences) |
| 2 | Microbiologist | 1<br>Open to all | **Essential Qualifications:**<br>Either 1 or 2<br><br>1.MBBS with MD/DNB in Medical Microbiology/Lab Medicine from Govt. recognized by MCI/DNB;<br><br>OR<br><br>2.Master of Science (MSc) in Medical Microbiology/ Microbiology/Biotechnology/ Biomedical Sciences; with Doctor of Philosophy (PhD) in Medical Microbiology / Microbiology/ Biotechnology/ Biomedical Sciences<br><br>**Experience required:**<br><br>≥ 3 years experience of working in clinical microbiology laboratory services/ public health | Rs.1,25,000/-<br>(For Medical)<br><br>Rs.1,00,000/-<br>(For non-Medical) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | program after obtaining the post graduate degree/PhD.<br><br>**Age Limit**<br>- 18 to 38 years for Open category,<br>- 18 to 43 Years for reserved categories. | |
| 3 | Veterinary Officer | 1<br>Open to all | **Essential Qualifications:**<br>- A Post graduate Veterinary degree from a recognized university in Veterinary Public Health<br>- OR<br>- Veterinary Epidemiology<br>- OR<br>- Veterinary Medicine<br>- OR<br>- Veterinary Microbiology<br>- OR<br>- Veterinary preventive medicine<br>- OR<br>- Veterinary Pathology.<br>WITH<br>- Registration in the Veterinary Council of India or Veterinary Council of States<br>**Experience required:**<br>1. ≥ 5 years post qualification experience in Veterinary Public health or Veterinary Epidemiology or Animal Health.<br>2. Relevant experience in public health, preferably in disease surveillance and outbreak investigations.<br>**Age Limit**<br>**-18 to 38 years for Open category,**<br>**-18 to 43 Years for reserved categories.** | Rs 75,000/- |
| 4 | Technical Assistant | 1<br>SC-1 | **Essential Qualifications:**<br>1) B. Sc in MLT from recognized university<br><br>**Experience required:**<br>**Essential:**<br>1. ≥ 2 years experience in clinical microbiology Laboratory.<br>2.Must be Proficient in computer applications (MS-Word, Excel and Power Point).<br><br>**Desirable:**<br>Work experience in bacteriology laboratory.<br><br>**Age Limit**<br>**-18 to 38 years for Open category,**<br>**-18 to 43 Years for reserved categories.** | Rs 30,000/- |
| 5 | Training Manager | 1<br>Open to all | **Essential Qualifications:**<br>1)Graduate with MBA, preferably in HR management<br>**Experience required:**<br>≥ 3 years of relevant post qualification experience preferably in health or social sector.<br><br>**Age Limit**<br>**-18 to 38 years for Open category,**<br>**-18 to 43 Years for reserved categories.** | Rs 60,000/- |
| 6 | Technical Officer (IT) | 2<br>SC-1<br>OPEN-1 | **Essential Qualifications:**<br>**Either 1 or 2**<br>1.Post Graduate Degree in IT/Computer Science such as M.Tech/MBA(IT)/MCA/M.SC(CS/IT)<br>OR<br>Graduate in IT/Computer Science such as B.E/B.Tech/BIT/BCA.<br><br>**Experience required:**<br>1. ≥ 4 years after Post Graduate Degree in Project planning and Implementation of information Technology<br>OR<br>2. ≥ 6 years after Graduate degree in Project | Rs 75,000/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | planning and Implementation of Information Technology<br><br>**Age Limit**<br>**-18 to 38 years for Open category,**<br>**-18 to 43 Years for reserved categories.** | |
| 7 | Data Analyst | 1<br>Open to all | **Essential Qualifications:**<br>Post Graduate Degree in Computer application or equivalent qualification from a recognized university.<br>**Experience required:**<br>1.Well versed with MS Office (Word, Excel, Power point and Access) and preferably in other statistical software packages like SPSS, STATA etc.<br>2. 5 years' experience post PG qualification of working in data analysis or M&E roles required<br><br>**Age Limit**<br>**18 to 38 years for Open category,**<br>**18 to 43 Years for reserved categories.** | Rs 60,000 |

**अटी व शर्ती :-**

१) इच्छुक उमेदवारांनी **https://www.pmc.gov.in या** संकेतस्थळावरील ऑनलाईन फॉर्म डाऊनलोड करून घ्यावा. सदर फॉर्म व आवश्यक स्वसाक्षांकित कागदपत्रे दिनांक ०५/०९/२०२५ ते १२/०९/२०२५ पर्यंत ३ रा मजला, मुख्य इमारत, शिवाजी नगर, आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे येथे कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्टी वगळता) जमा करावीत.

तदनंतर अर्जाची छाननी करून उमेदवारांची पात्र / अपात्र इत्यादीबाबत सविस्तर वेळोवेळी पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर **https://www.pmc.gov.in** प्रसिद्ध करण्यात येईल.

अर्जा सोबत आवश्यक कागदपत्रांचा तपशील :-

I)पासपोर्ट साईज फोटो,

II)जन्म तारखेकरिता (वयाचा दाखला/दहावीचा टीसी/जन्म प्रमाणपत्र),

III)फोटो आयडी/रहिवाशी दाखला

IV)शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र :-

अ) शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका, ब) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, क) अतिरिक्त शैक्षणिक अर्हतेची MMC नोंदणी प्रमाणपत्र, ड) नोंदणी नूतनीकरण प्रमाणपत्र ई) अनुभव प्रमाणपत्र या अनुषंगाने इतर आवश्यक सत्य प्रती व साक्षांकित प्रती २) सदरील पदे कंत्राटी पद्धतीने राहतील, त्याचा पुणे महानगरपालिका आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही तसेच सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी दि. २५ ऑगस्ट २००५ रोजी पारित केलेल्या शासन निर्णय अन्वये लोकसेवा आयोगाच्या कक्षातील पदावर तात्पुरत्या/अस्थायी स्वरूपात नियुक्त केलेला कोणताही कर्मचारी त्या पदावर कितीही वर्ष सेवेत राहिला तरी कायम करणाचा हक्क सांगू शकत नाही. ३) एकूण पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो. ४) सदरील पदे निव्वळ ६ महिने कालावधीसाठी भरायचे असून प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील. ५) अनुभव शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा खाजगी अंतर्गत अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. ६) उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास त्यांना नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल. ७) निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त, पुणे मनपा यांनी राखून ठेवले आहेत. ८) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल. परंतु अंतिम निर्णय प्रशासन घेईल. ९) अंतिम निवड यादीतील उमेदवारांना मेट्रोपोलिटन सर्वेलन्स युनिट कार्यालयांतर्गत काम करणे बंधनकारक राहिल. अन्यत्र विभागामध्ये कामासाठी नियुक्त करणेकामी उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल. १०) उपरोक्त पदांकरिता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जांच्या संख्येनुसार छाननी करून गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवून गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. ११) अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये सोयीनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही. १२) सदर भरतीची प्रक्रिया पूर्ण झालेनंतर भविष्यात एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतीक्षा यादीतील मेरीटमधील पुढील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न

करता नियुक्ती आदेश दिले जातील. १३) सदर अंतिम यादी ही तयार झालेनंतर पुढील १ वर्षासाठी वैध राहील. १४) उमेदवाराची निवड झाल्यास त्याला र.रु.५००/- च्या बाँड पेपरवर करार सादर करावा लागेल. १५) उमेदवाराला लागू निश्चित मोबदला वगळता इतर कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही. १६) करार ६ महिन्यांच्या विशिष्ट कालावधीसाठी आहे आणि उमेदवाराच्या कामगिरीच्या आधारावर पदाचे नूतनीकरण केले जाईल. १७) कराराच्या कालावधीत कंत्राटी उमेदवारांचे काम असमाधानकारक असल्यास, अशा उमेदवारांची कंत्राटी तत्त्वावरील नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त केली जाईल. १८) कराराच्या कालावधीत निवडलेल्या उमेदवारांना पुणे महानगरपालिकेचे कोणतेही प्रशासकीय किंवा आर्थिक अधिकार दिले जाणार नाहीत. १९) पत्र व्यवहाराचा पत्ता स्पष्ट आणि पूर्ण असावा. २०) उमेदवारांनी त्यांच्या स्वखर्चाने निवडीच्या ठिकाणी उपस्थित असणे आवश्यक आहे. २१) उमेदवारांनी चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे आढळल्यास किंवा निवड प्रक्रिया किंवा नियुक्ती सुरू झाल्यानंतर कोणत्याही वेळी कोणतीही माहिती रोखून ठेवल्याचे आढळल्यास त्यांना अपात्र ठरवले जाईल. तसेच, नियुक्ती झाल्यास, त्यांची कंत्राटी नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता संपुष्टात येईल. २२) कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या उमेदवारांच्या सेवा पूर्वसूचनेशिवाय समाप्त करण्याचा अधिकार प्रशासनाकडे आहे. २३) करार कालावधीत काम करणाऱ्या उमेदवारांची सेवा तात्पुरती असल्याने त्यांची सेवा ज्येष्ठतेसाठी ग्राह्य धरली जाणार नाही किंवा सेवेला ज्येष्ठतेसाठी प्राधान्य दिले जाणार नाही. २४) पुणे महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला किंवा इतर कोणत्याही संस्थेला अर्ज विकण्याचा किंवा स्वीकारण्याचा अधिकार दिलेला नाही याची नोंद घ्यावी. २५) जर उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला किंवा अयोग्य मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आले किंवा खोटे बोलणाऱ्यांची व्यवस्था केल्याचे आढळून आले, तर त्याला निवडीपासून अपात्र ठरवले जाईल. २६) उमेदवारांना पुणे महानगरपालिकेसाठी मध्यस्थ असल्याची बतावणी करणाऱ्या व्यक्तीमार्फत नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. २७) जर उमेदवाराने विहित वेळेनंतर कोणतीही कागदपत्रे सादर केली तर ती कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत आणि त्याचा अर्ज अपात्र मानला जाईल. २८) ज्या पदांसाठी जाहिरात दिली आहे त्या पदांसाठी लागणारा अनुभव कमी किंवा जास्त करणे, वयोमर्यादा कमी किंवा जास्त करणे याचे सर्वस्वी अधिकार किंवा शैक्षणिक अर्हतेमध्ये बदल करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत. याबाबत तक्रार करणे/आक्षेप घेणेचा उमेदवारास अधिकार असणार नाही याची नोंद घ्यावी.

**(एम.जे. प्रदीप चंद्रन)**
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
**पुणे महानगरपालिका**